सत्तमो पाठो ।

# अञ्ञासिकोण्डञ्ञ थेरो ।

'थेरगाथा' हा खुद्दनिकायाचा आठवा ग्रंथ आहे. या ग्रंथात २६४ थेरांच्या (म्ह. भिक्खुच्या) गाथा संकलित केल्या आहेत. हा ग्रंथ स्वकथनात्मक स्वरूपाचा असून प्रामुख्याने भिक्खूंच्या भिक्खू होण्यापूर्वीच्या जीवनाची माहिती यात वर्णन केली आहे. तसेच भिक्खू झाल्यावर त्यांच्या जीवनात तथागत बुद्धाच्या उपदेशाने त्यांना उच्च प्रतीचा आनंद कसा प्राप्त झाला याचेही वर्णन या ग्रंथातून दिसून येते. त्या शिवाय भिक्खूंनी तथागत बुद्धाच्या वेगवेगळ्या शिकवणीवर आणि तत्त्वज्ञानावर भाष्य केल्याचे पाहावयास मिळते.

प्रस्तुत गाथा ह्या तत्त्वज्ञानात्मक स्वरूपाच्या असून यामध्ये तथागत बुद्धाच्या शिष्यांमध्ये वयाने सर्वांत मोठे आणि सर्वांत प्रथम अर्हंत झालेल्या अञ्ञासिकोण्डञ्ञ थेराने कामासक्त लोकांना उपदेश करताना गायिलेल्या गाथा आहेत. अनिच्च, दुक्ख व अनत्त हे तथागत बुद्धाच्या महान शिकवणीतील तत्त्वज्ञान थेराने सहजगत्या व्यक्त करीत मानवाच्या दुक्ख-मुक्तीचा मार्ग सांगितला आहे.

---

एस भिय्यो पसीदामि, सुत्वा धम्मं महारसं ।
विरागो देसितो धम्मो, अनुपादाय सब्बसो ॥१॥

बहूनि लोके चित्रानि, अस्मिं पठविमण्डले ।
मथेन्ति मञ्ञे सङ्कप्पं, सुभं रागूपसंहितं ॥२॥

रजमुहतं च वातेन, यथा मेघोपसम्मये ।
एवं सम्मन्ति सङ्कप्पा, यदा पञ्ञाय पस्सति ॥३॥

सब्बे सङ्खारा अनिच्चा ति, यदा पञ्ञाय पस्सति ।
अथ निब्बिन्दति दुक्खे, एस मग्गो विसुद्धिया ॥४॥

सब्बे सङ्खरा दुक्खा ति, यदा पञ्ञाय पस्सति ।
अथ निब्बिन्दति दुक्खे, एस मग्गो विसुद्धिया ॥५॥

सब्बे धम्मा अनत्ता ति, यदा पञ्ञाय पस्सति ।
अथ निब्बिन्दति दुक्खे, एस मग्गो विसुद्धिया ॥६॥

बुद्धानुबुद्धो यो थेरो, कोण्डञ्ञो तिब्बनिक्कमो ।
पहीनजातिमरणो, ब्रह्मचरियस्स केवली ॥७॥

ओघपासो दळहखिलो, पब्बतो दुप्पदालयो ।
छेत्वा खिलं च पासं च, सेलं भेत्वान दुब्भिदं ॥
तिण्णो पारङ्गतो झायी, मुत्तो सो मारबन्धना ॥८॥

उद्धतो चपलो भिक्खु, मित्ते आगम्म पापके ।
संसीदति महोघस्मिं, ऊमिया पटिकुज्जितो ॥९॥

अनुद्धतो अचपलो, निपको संवुतिन्द्रियो ।
कल्याणमित्तो मेधावी दुक्खस्सन्तकरो सिया ॥१०॥

कालपब्बङ्गसङ्कासो, किसो धमनिसन्थतो ।
मत्तञ्ञू अन्नपानस्मिं अदीनमनसो नरो ॥११॥

फुट्ठो डंसेहि मकसेहि, अरञ्ञस्मिं ब्रहावने ।
नागो सङ्गामसीसे व, सतो सत्राधिवासये ॥१२॥

नाभिनन्दामि मरणं, नाभिनन्दामि जीवितं ।
कालञ्च पटिकङ्खामि, निब्बिसं भतको यथा । ॥१३॥

नाभिनन्दामि मरणं, नाभिनन्दामि जीवितं ।
कालञ्च पटिकङ्खामि, सम्पजानो पतिस्सतो ॥१४॥

परिचिण्णो मया सत्था, कतं बुद्धस्स सासनं ।
आहितो गरूको भारो, भवनेत्ति समूहता ॥१५॥

यस्स चत्थाय पब्बजितो, अगारस्मानगारियं ।
सो मे अत्थो अनुप्पत्तो, किं मे सद्धिविहारिना' ति ॥१६॥

*(थेरगाथा - नालंदा प्रकाशन)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**भिञ्ञो** (अ.) - अत्याधिक, अतिशय
**विरागो -विराग** (पुं.) - अनासक्त, वैराग्ययुक्त
**सब्बसो** (क्रि.वि.) - सर्व तऱ्हेने
**मथन्ति** (मथति, क्रि.) - घुसळतात
**महोघस्मिं** (महोघ पुं.) - महापुरात
**निपको** (वि.) - दक्ष
**धमनिसन्थतो** - संपूर्ण शरीर धमन्या-नसांनी मढलेला
**भत्तको** (भतक, पुं.) - नोकर
**परिचिण्णो** (परिचिण्ण, कृ.) - सेवा केलेला
**पसीदामि (पसीदति)** (क्रि.) - मी प्रसन्न आहे
**देसितो** (देसित कृ.) - उपदेशित, उपदेश केलेला
**पठविमण्डले** - (स्त्री.) - पृथ्वीतलावर
**पहिनजाति**- जन्म-मृत्यू क्षीण झाला
**उम्मिया** (उम्मि, स्त्री.) - लाटा
**किसो** (किस, वि.) - कृश, अशक्त, दुर्बळ
**निब्बिस** (वि.) - स्वतंत्र, मुक्त झालेला
**सम्पजानो** (सम्पजान, वि.) - जागृतीपूर्वक
**गरूको** (गरुक, वि.) - भारी

## अभ्यास

१. **खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**
(१) अञ्ञाकोण्डञ्ञो थेराने लोकांना कोणता उपदेश केला ?
(२) मार्गभ्रष्ट भिक्खूंना थेराने कसा उपदेश केला ?
(३) ज्ञानप्राप्ती प्रकट करताना थेर स्वतःबद्दल काय म्हणतात ?

**टिपणे**

- अनिच्च, दुक्ख, अनत्त ह्या संकल्पना स्पष्ट करा.
- बंधन म्हणजे काय? बंधनातून मुक्त कसे व्हावे?

✶✶✶